पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१)
यांचे कार्यालय
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,
अंधेरी पोलीस ठाणे आवार, अंधेरी (पुर्व),
मुंबई - ४०० ०६९.

दूरध्वनी क्र. ०२२-२६८३३०५४
Email : dcpdetection1.mum@mahapolice.gov.in

# प्रेसनोट

कक्ष-६, गु.प्र.शा., गु.अ.वि., चेंबूर, मुंबई     दिनांक : २४/११/२०२२

केंद्र शासनाने संरक्षित म्हणून घोषित केलेल्या UIDAI (AADHAR) ची CDIR ची या संगणक प्रणाली मधील नागरीकांच्या आधार कार्डाची गोपनीय माहिती चोरी करून त्याची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या टोळीवर गुन्हे शाखा, कक्ष ६ ची कारवाई.

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष-६ गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.अ.विभाग, चेंबूर, मुंबई. |
| पोलीस ठाणे | चेंबुर पोलीस ठाणे, मुंबई. |
| गुन्हा नोंद क्र. व कलम | गु.प्र.शा. गु.र.क्र.३०४/२०२२, कलम ३७९,३४ भा.दं.वि. सह ४३(ब),सह कलम ६६,७०(१) सह कलम ६६(एफ)(ए)(३) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० (चेंबूर पोलीस ठाणे गु.र.क्र. ६४७/२०२२) |
| गुन्हा दाखल दिनांक | दि. २३/११/२०२२ रोजी १८:०९ वा. |
| फिर्यादी नाव | श्री. रणजीत चंद्रकांत चव्हाण, व्यवसाय - नोकरी (पो.शि.क्र. ०९०६६४), रा. ठि. ०१/१०, वृंदावन सोसायटी, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई. |
| ताब्यात घेतलेल्या आरोपीची संख्या | ०२ पुरुष इसम |

सध्याच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान अवगत असणे काळाजी गरज झाली आहे. त्यामुळे शासनाने देखील सर्व सोयी-सुविधा डिजीटल करण्याकडे जास्तीत जास्त भर दिला आहे. त्यामुळे आधारकार्ड, पॅनकार्ड पासपोर्ट व इतर सर्व सुविधा ऑनलाईन उपलब्ध आहेत. परंतू नमूद सर्व वैयक्तिक संगणकीय माहितीचे सवंर्धन व सरंक्षण करणे हे देखील तितकेच संवदेनशील आणि आव्हानात्मक आहे. शासन सातत्याने त्यादृष्टीने अधिक कायदे व नियम अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. तंत्रज्ञानाचा गैरवापर होवू नये आणि सर्वसामन्य नागरीकांची वैयक्तिक गोपनीय माहितीचा गैरवापर होणार नाही याकरीता माहिती तंत्रज्ञान कायदा अंमलात आहे. तरीदेखील संगणकीय माहिती चोरी करण्याचे प्रयत्न वांरवार होत असल्याने, अशाप्रकारचे चोरीचे गुन्हे उघड करणे पोलीसांसमोर खूप मोठे आव्हान आहे.

त्याअनुषंगाने, मा. सह पोलीस आयुक्त, (गुन्हे), बृहन्मुंबई आणि पोलीस उप आयुक्त, (प्रकटीकरण - १), गुन्हे शाखा, मुंबई यांनी गांभीर्याने दखल घेवून अशाप्रकारच्या गुन्हयांचा प्रतिबंध करण्याकरीता विशेष प्रयत्न करण्याचे आदेश दिले आहेत.

प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र साळुंखे यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराने माहिती दिली की, एक इसम त्याचे साथीदारांसह Tracenow.co.in व www.fonivotech.com अशा नावाच्या दोन वेबसाईट विकसित केल्या असून, त्या ॲप्लीकेशनच्या माध्यमातून तो महाराष्ट्र, दिल्ली व गुजरात राज्यातील नागरीकांची त्यांचे नावावरून किंवा आधारकार्ड लिंक मोबाईल क्रंमाकावरून त्यांचे संपूर्ण नाव, गाव, पत्ता सर्व जुने बंद झालेले व चालू असलेले मोबाईल क्र., ई मेल आय.डी., जन्म तारीख, कुटुंबातील सदस्य त्यांची माहिती, त्यांचे आधारकार्ड लिंक मोबाईल नंबर  याबाबत इंत्यभुंत माहिती मिळते.

नमूद वेबसाईट वरून कशाप्रकारे माहितीची देवाण घेवाण होते किंवा खरेदी विक्री होते यादृष्टीने अभ्यास करून, तांत्रिक विश्लेषण व गोपीनीय पध्दतीने सातत्याने सलग दोन माहिने प्रयत्न करून, आरोपी इसमाचे कार्यालय व निवासस्थान याबाबत माहिती प्राप्त झाली. त्यावरून आरोपी इसमाचे कार्यालय व निवासस्थान याठिकाणी निगराणी ठेवण्यात येत होती. दरम्यान पोलीस पथकाने त्यादृष्टीने अधिकाअधिक प्राथमिक पुरावा आणि इतरही गोपनीय माहिती संकलित करून पुराव्याच्या आधारावर  दिनांक २३/११/२०२२ रोजी चेंबूर पोलीस ठाणेस गुन्हा दाखल करून, पोलीसांची दोन पथके तयार करून एकाच वेळी आरोपीचे कार्यालय व राहते निवासस्थानी छापा टाकून तेथून सर्व संगणक, लॅपटॉप, मोबाईल, सिम कार्ड पंचनामा करून हस्तगत करून त्यामधुन संगणकिय डाटा संकलित केला आहे. गुन्हयात दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून दिनांक २४/११/२०२२ रोजी मा. न्यायालयासमक्ष रिमांड कामी हजर केले असता, मा. न्यायालयाने गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून आरोपींना १२ दिवस पोलीस कोठडी दिली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कक्ष ६ कार्यालयातील पोलीस निरीक्षक प्रशांत पवार करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री सुहास वारके सो, मा.पोलीस उप आयुक्त , श्री. संग्रामसिंह निशाणदार सो, श्री कृष्ण कान्त उपाध्याय सो व मा.सपोआ (डी पुर्व), चंद्रकांत जाधव सो यांचे मार्गदर्शनाखाली  कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक रविंद्र साळुंखे, पो.नि. प्रशांत पवार, पो.नि. एच.एम. ननावरे, स.पो.नि. सचिन गावडे, स.पो.नि. मिरा देशमुख, पोलीस उप निरीक्षक रामदास कदम/कक्ष ७,पोलीस उप निरीक्षक सुभाष मुठे, पोलीस उप निरीक्षक संदिप रहाणे, पोलीस उप निरीक्षक नंदकुमार बेळणेकर, स.फौ. २७५३५/सावंत, स.फौ. २७८७१/आव्हाड, स.फौ.क्र. २९३६१/ देसाई, पो.ह.क्र. ३१९५६/पारकर, पो.ह.क्र. ९७०५४२/भिलारे, पो.ह.क्र. ९८०६९७/तुपे, पो.ना.क्र. ०४०३६३/शिंदे, पो.ना.क्र.०४११३२/गायकवाड, पो.ना.क्र.०३१००८/वानखेडे,पो.ना.क्र.०५०७४२/मोरे,पो.ना.क्र.०६१२९४/आराख,पो.शि.क्र.०६१७०३/ घेरडे, पो.शि.क्र.०७०४००/भालेराव, पो.शि.क्र.०७०७७४/माळवेकर, पो.शि.क्र. ०८०२९६/ कोळेकर, पो.शि.क्र.०८०३३९/इंगळे,पो.शि.क्र.०९०६६४/चव्हाण,पो.शि.क्र.०९०३१९७/पवार,पो.शि.क्र.०११०६४१/ शेख,म.पो.शि.क्र. ०७११९३-दळवी/कक्ष ७, म.पो.शि. ०९०२०५५/सरोदे, पो.ना.चा.क्र. ९८०७६५/डाळे, पो.ना.चा.क्र. ०३१५२४/जायभाये आणि पो.शि.चा.क्र. १७१३६५/पाटील यांचे पथकाने पार पाडली आहे.

****D-1/ 36 /2022****